दैनिक
सह्याद्रीचा राखणदार
www.sahyandrinews.com
• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •
• (महाराष्ट्र) वर्ष ०२ • १८६ • RNI : MAHMAR/2023/87818 • रविवार, दि.११ मे २०२५ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

Agro. Tourism & Adventure Park
कृषी पर्यटन व ॲडवेंचर पार्क
कोळोणा (खोडेगाव), पुलगाव जवळ, ता. देवळी जि. वर्धा

पाकिस्तानने ३ तासांतच युद्धबंदीचे उल्लंघन केले: श्रीनगरसह अनेक शहरांमध्ये ड्रोन हल्ले

जम्मू-काश्मीर, राजस्थान-पंजाबमध्ये पुन्हा ब्लॅकआउट

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)–शनिवारी संध्याकाळी ५ वाजता भारत आणि पाकिस्तानमधील युद्धबंदी लागू झाली. त्यानंतर अवघ्या ३ तासांतच पाकिस्तानने शस्त्रसंधीचे उल्लंघन केले. रात्री ८ वाजल्यापासून जम्मू-काश्मीरमधील अखनूर, पूंछ, नौशेरा, श्रीनगर, आरएस पुरा, सांबा, उधमपूर येथे पाकिस्तानकडून गोळीबार सुरू आहे. राजौरीमध्ये तोफांचा मारा करण्यात आला. उधमपूरमध्ये ड्रोन हल्ला झाला.जम्मू-काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला म्हणाले – ही कोणत्या प्रकारची युद्धबंदी आहे? श्रीनगरमध्ये स्फोटांचे आवाज ऐकू येत आहेत.

पाकिस्ताननेही युद्धबंदीची पुष्टी केली.

पाकिस्तानचे परराष्ट्र मंत्री इशाक डार म्हणाले, 'पाकिस्तान आणि भारत यांनी तात्काळ प्रभावीपणे युद्धबंदीवर सहमती दर्शविली आहे. पाकिस्तानने नेहमीच आपल्या सार्वभौमत्वाशी आणि प्रादेशिक अखंडतेशी तडजोड न करता या प्रदेशात शांतता आणि सुरक्षिततेसाठी प्रयत्न केले आहेत.बुधवारी रात्री अमेरिकेच्या परराष्ट्रमंत्र्यांनी भारत आणि पाकिस्तानशी चर्चा केली अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी बुधवारी रात्री पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि भारताचे परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांच्याशी चर्चा केली. त्यांनी दोन्ही देशांना तणाव कमी करण्याचे आणि दक्षिण आशियात शांतता प्रस्थापित करण्यासाठी एकत्र काम करण्याचे आवाहन केले.



दहशतवादाचा निषेध केला, पण भारताला संयम बाळगण्यास सांगितले

अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाचे प्रवक्ते टॅमी ब्रूस म्हणाले की, मार्को रुबियो यांनी पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यात जीव गमावलेल्यांसाठी फोनवरून जयशंकर यांच्याशी शोक व्यक्त केला. ते म्हणाले की, दहशतवादाविरुद्ध अमेरिका भारतासोबत आहे. तथापि, त्यांनी भारताने हल्ल्यासाठी पाकिस्तानला दोष देताना आणि बदला घेण्याची मागणी करताना सावधगिरी बाळगण्याचा सल्लाही दिला.दरम्यान, टॅमी ब्रूस म्हणाले की, पंतप्रधान शरीफ यांच्याशी फोनवरून झालेल्या संभाषणादरम्यान रुबियो यांनी पाकिस्तानला २२ एप्रिल रोजी काश्मीरमध्ये झालेल्या हल्ल्याचा निषेध करण्यास आणि तपासात सहकार्य करण्यास सांगितले. अमेरिकेच्या परराष्ट्रमंत्र्यांनी पाकिस्तानी अधिकाऱ्यांना या हल्ल्याच्या तपासात पूर्ण सहकार्य करण्याची विनंती केली होती.

जम्मू-काश्मीर, राजस्थान-पंजाबमध्ये पुन्हा ब्लॅकआउट

युद्धबंदीच्या घोषणेनंतर, जम्मू-काश्मीर, राजस्थान आणि पंजाबच्या सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये ब्लॅकआउट रद्द करण्यात आला. पण, जम्मू-काश्मीरमध्ये पाकिस्तानकडून झालेल्या गोळीबारानंतर पुन्हा ब्लॅकआउट लागू करण्यात आला आहे. सीमावर्ती जिल्ह्यांमध्ये वीजपुरवठा खंडित झाला आहे. लोकांना घराबाहेर पडू नये असा सल्ला देण्यात आला आहे.

ट्रम्प यांनी युद्धबंदी बद्दल ट्विट केले होते

तत्पूर्वी, अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी एक्स वर पोस्ट केली. डोनाल्ड ट्रम्प म्हणाले, 'अमेरिकेच्या मध्यस्थीखाली काल रात्री झालेल्या दीर्घ चर्चेनंतर, मला हे कळवण्यास आनंद होत आहे की भारत आणि पाकिस्तानने हल्ले तात्काळ आणि पूर्णपणे थांबवण्यास सहमती दर्शविली आहे. दोन्ही देशांनी एक सामान्य आणि समंजस निर्णय घेतल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो.


कामगार मंत्री फुंडकर यांच्या निर्णया कडे राज्यातील गुणवंत कामगारांचे लक्ष

प्रवासी सवलतीच्या मागणीसाठी लेखी निवेदन सादर

चंद्रपूर । प्रतिनिधी

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या वतीने १३ मे २०२५ रोजी विश्वकर्मा गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार मुंबई येथे महामहीम राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कामगार मंत्री तसेच राज्य व केंद्र शासनातील विविध मंत्री आणि प्रमुख प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात येणार आहेत.

या पुरस्कारप्राप्त गुणवंत कामगारांना राज्य परिवहन महामंडळाच्या बसमधून प्रवासात सवलत मिळावी, अशी मागणी राज्य गुणवंत कामगार असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष देवराव कोंडेकर यांनी राज्य सरकारकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.





याबाबत कामगार मंत्री आकाश फुंडकर आणि राज्यमंत्री आशिष जयस्वाल हे कोणती घोषणा करणार, याकडे आता राज्यभरातील कामगारांचे लक्ष लागले आहे.

राज्य शासनाच्या इतर विभागांमार्फत दिल्या जाणाऱ्या पुरस्कारप्राप्त व्यक्तींना जसे की अण्णाभाऊ साठे पुरस्कार, डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलितमित्र पुरस्कार, महात्मा गांधी व्यसनमुक्ती पुरस्कार आदींना राज्य परिवहन महामंडळाच्या बसमध्ये प्रवासात सवलत दिली जाते. मात्र कामगार कल्याण मंडळाच्या पुरस्कारप्राप्त कामगारांना अद्याप असा कोणताही लाभ मिळालेला नाही, ही बाब उल्लेखनीय आहे.

राज्य शासनाच्या कामगार विभागामार्फत सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक, सांस्कृतिक, कला-क्रीडा, संघटनात्मक आणि वंचित घटकांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या नोंदणीकृत कामगारांना विश्वकर्मा गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार देऊन गौरविण्यात येते. या पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम राज्याच्या मान्यवरांच्या उपस्थितीत अत्यंत भव्यदिव्य स्वरूपात संपन्न होतो आणि कामगारांच्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण ठरतो.

या पार्श्वभूमीवर कामगार कल्याण मंडळाने कामगारांना प्रवासी सवलत मिळावी यासाठी प्रस्ताव तयार करून कामगार कल्याण आयुक्तांमार्फत प्रधान सचिव (कामगार) यांच्याकडे पाठवला होता. तो प्रस्ताव अंतिम मंजुरीसाठी सध्या कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या मंजुरीसाठी प्रलंबित आहे. विशेष म्हणजे, या सवलतीसाठी शासनावर कोणताही अतिरिक्त आर्थिक बोजा पडणार नाही.राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ११ फेब्रुवारी रोजी मंत्रालयात झालेल्या बैठकीत या मागणीबाबत लवकरच सकारात्मक निर्णय घेण्याचे आश्वासन दिले होते, अशी माहितीही देवराव कोंडेकर यांनी दिली.या निवेदनाच्या प्रती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, कामगार राज्यमंत्री, प्रधान सचिव (कामगार) आणि कामगार कल्याण आयुक्त यांनाही देण्यात आल्या आहेत.या वेळी राज्य गुणवंत कामगार असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष देवराव कोंडेकर, नरेंद्र रहाटे, संतोष ताजने आदी गुणवंत कामगार उपस्थित होते.

ज्ञान, विज्ञान व कौशल्य विकासातून ग्रामीण प्रगती शक्य-केंद्रीय मंत्री गडकरी

'देह वेचावा कारणी' आत्मचरित्राच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन लोणीत संपन्न

शिर्डी । प्रतिनिधी

ग्रामीण विकासाचा निर्देशांक १२ टक्क्यांवरून २६ टक्क्यांवर नेण्यासाठी शिक्षणासोबत विज्ञान, तंत्रज्ञान आणि कौशल्य विकासावर भर देणे अत्यावश्यक आहे. जलसंधारण, सेंद्रिय शेती आणि सौरऊर्जेसारख्या उपाययोजनांनी ग्रामीण भागात सकारात्मक परिवर्तन घडू शकते, असा विश्वास केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केला.

लोणी येथे स्वर्गीय पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील लिखित 'देह वेचावा कारणी' या आत्मचरित्राच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन गडकरी यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी राज्याचे जलसंपदा तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील, आमदार सर्वश्री शिवाजीराव कर्डीले, आ. मोनिका राजळे, आ. काशिनाथ दाते, आ. विठ्ठलराव लंघे, आ. विक्रमसिंह पाचपुते, आ. अमोल खताळ, प्रवरा अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. राजेंद्र विखे पाटील, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, सौ. शालिनी विखे पाटील, सौ. सुवर्णा विखे पाटील, ध्रुव विखे पाटील, आदीउपस्थित होते.केंद्रीय मंत्री



गडकरी म्हणाले, पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील आणि बाळासाहेब विखे पाटील यांचे कार्य प्रेरणादायी आहे. ग्रामीण भागातील स्थलांतर थांबवायचे असेल तर विकासाला प्राधान्य देणे आवश्यक आहे. शेतीच्या व्यवस्थेत मूलभूत सुधारणा केल्यास शेतकरी आत्मनिर्भर बनतील. विदर्भातील जलसंधारणामुळेच शेतकरी उर्जादाता बनत आहेत.ते पुढे म्हणाले की, रासायनिक खतांमुळे जमीन खराब होत आहे. सेंद्रिय शेतीला आणि सौरऊर्जेला प्राधान्य द्यावे लागेल. दुग्ध व्यवसायासाठी नवे वाण वापरल्यास शेतकऱ्यांना नवा मार्ग मिळू शकतो. ग्रामीण-शहरी दरी मिटवण्यासाठी रस्त्यांचा विकास आणि जलसंधारण ही दोन महत्त्वाची शस्त्रे ठरतील.

जिल्ह्यातील रस्ते योजनांबाबत गडकरी म्हणाले की, नांदूर शिंगोटे, सिन्नर आणि सुरत-चेन्नई मार्गांसह जिल्ह्यातील सर्व रस्त्यांची कामे पूर्ण केली जातील. त्यासाठी स्थानिकांना खर्च करावा लागणार नाही. या कामांबरोबरच जलसंधारणाच्या उपक्रमांनाही आमच्या मंत्रालयाकडून मदत दिली जाईल. गडकरी म्हणाले, लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील यांनी सहकारातून शैक्षणिक प्रकल्प उभारून ग्रामीण भागात परिवर्तन घडवले. त्यांचे आत्मचरित्र म्हणजे सामाजिक बांधिलकी आणि त्यागाचे प्रतिबिंब आहे. देशात सध्या विचारशून्यता ही मोठी समस्या बनली असून, अशा स्वच्छ विचारसरणीच्या नेतृत्वाची गरज आहे.पालकमंत्री श्री.विखे पाटील म्हणाले, स्वर्गीय पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांचे आत्मचरित्र म्हणजे पन्नास वर्षांच्या राजकीय व सामाजिक वाटचालीचा ऐतिहासिक दस्तऐवज आहे. त्यांच्या नावाने राष्ट्रीय स्तरावर सहकार, कृषी, शिक्षण आणि जलसंधारण क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देण्यात येणार आहे. या समितीच्या अध्यक्षपदाची जबाबदारी गडकरी साहेबांनी स्वीकारली आहे. कार्यक्रमात माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के पाटील आणि डॉ. सुजय विखे पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. राज्यभरातून विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी या कार्यक्रमाला उपस्थिती लावली होती.

खड्ड्यांमध्ये विकास गडप! – यशोदा नगरातील रस्ता सहा महिन्यांतच उखडला; निवेदन धूळखात, संतप्त नागरिकांचा इशारा

वरोरा । प्रतिनिधी

यशोदा नगर पावडे लेआउट बोर्ड परिसरातील नागरिकांचा संयम आता संपत चालला आहे. पाचभाई यांच्या घरापासून ते फिल्टर प्लांटपर्यंत मार्च २०२३ मध्ये बांधण्यात आलेल्या रस्त्याची अवस्था अवघ्या काही महिन्यांतच इतकी खराब झाली आहे की, तो रस्ता आहे की खड्ड्यांची मालिका, हेच समजेनासं झालं आहे.


या खड्ड्यातून वाहन चालवणे तर दूरच, पण पायदळ चालणेही धोकादायक ठरत आहे. विशेषतः शाळेत जाणाऱ्या विद्यार्थ्यांना रोजच्या प्रवासात जीव मुठीत धरावा लागत आहे.

या दुरवस्थेविरोधात स्थानिक नागरिकांनी १० ऑक्टोबर २०२३ रोजी ग्रामपंचायतीकडे अधिकृत निवेदन दिले होते. मात्र, एवढे वर्ष उलटून गेले तरीही रस्त्याच्या दुरुस्तीकडे कोणताही गांभीर्याने विचार झालेला नाही.

केवळ खडी टाकून फोटो काढले, पण खड्डे तसंच आहेत! अशी तक्रार संतप्त नागरिकांनी केली. रस्त्याच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करत त्यांनी सार्वजनिक निधीचा अपव्यय झाल्याचा आरोप केला आहे.या गंभीर समस्येकडे ग्रामपंचायतीने तातडीने लक्ष देऊन ठोस उपाययोजना न केल्यास संघर्ष रस्त्यावर सुरू करू, असा इशारा आता नागरिकांनी दिला आहे.या भागातील वाढती लोकसंख्या आणि वाहतूक लक्षात घेता रस्त्याच्या दुरुस्तीकडे प्राधान्याने लक्ष दिले जाणे अत्यावश्यक असून, अन्यथा प्रशासनाविरोधात तीव्र आंदोलन उभं राहण्याची शक्यता आहे.



आम्ही शोधत आहोत!
ऑफसेट मशीन ऑपरेटर
*किमान २ वर्ष अनुभव असणे आवश्यक
WE ARE HIRING!
Offset Machine Operator
*Min 2 Years Experience required
आकर्षक पेमेंट | जेवण | राहण्याची सोय
• संबंधित क्षेत्रातील अनुभव असलेले उमेदवार प्राधान्याने
• कामाची जबाबदारी, शिस्त आणि वेळेचं भान आवश्यक
कामाचे ठिकाण: वरोरा, जिल्हा चंद्रपूर



अधिक माहिती साठी संपर्क करा
+91 901 170 8840
मातछाया भवन, कल्यानेश्वर हनुमान मंदिर समोर,
सह्याद्रीचा राखणदार
न्यूज अँड एंटरटेनमेंट एल.एल.पी

दैनिक सह्याद्रीचा राखणदार

झाडू घेऊन समाज परिवर्तनाची मशाल पेटवणारे एक सामान्य व्यक्तिमत्व–गेडाम



मूल । रोहित कामडे

दैनंदिन आयुष्याच्या गजबजलेल्या रहाटगाडग्यात अनेकजण स्वतःपुरतं जगतात, कुटुंब, काम आणि थोडा विरंगुळा एवढंच त्यांच्या आयुष्याचं परिघ ठरतं. पण काही माणसं अशीही असतात, ज्यांची सामाजिक जाणीव त्यांच्या वैयक्तिक आयुष्याच्या पलीकडे पोहोचलेली असते. अशीच एक प्रभावी आणि मनोवेधक कहाणी आहे मूल शहरातील बबलू गेडाम यांची.

सामान्य कामगार पण कार्य असामान्य. रोज सकाळी कपड्यांच्या दुकानात कामावर जाणं, दिवसभर कष्ट करणं आणि संध्याकाळी घरी परतणं हे त्यांचं रोजचं जीवन. पण या सामान्यतेच्या पलीकडे त्यांनी घेतलेली एक असामान्य जबाबदारी म्हणजे शहराची स्वच्छता. दुकान उघडण्याआधी आणि बंद केल्यानंतर, झाडू हातात घेऊन रस्त्यावर उतरणं, कचरा गोळा करणं, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता राखणं आणि लोकांमध्ये जनजागृती करणं हे त्यांचं नित्याचं कार्य आहे.

बबलू गेडाम यांचा सामाजिक प्रवास सुरू झाला २०२० साली. फेसबुकवर त्यांनी गौरव शामकुळे या तरुणाचं काम पाहिलं. गौरव दररोज रस्त्यावर झाडू मारून स्वच्छता करत असत. हे दृश्य पाहून बबलू गेडाम प्रचंड प्रेरित झाले. त्यांनी गौरवच्या कार्यात हातभार लावायला सुरुवात केली. काही दिवसांनी स्वतःचं वेगळं अभियान हाती घेतलं. आणि आज ते मूल शहरात निस्वार्थ समाजसेवक म्हणून ओळखले जात आहेत.

या कार्यात त्यांना ना आर्थिक लाभ आहे, ना कुठल्याही संस्थेचा आधार. प्रसिद्धीची त्यांना हौस नाही. त्यांना अपेक्षा आहे ती फक्त एकच आपला परिसर स्वच्छ, सुंदर आणि निरोगी असावा. ते म्हणतात, कचरा हा केवळ नगरपरिषदेचा नाही, तर प्रत्येक नागरिकाचा प्रश्न आहे. मला फक्त माझं कर्तव्य पार पाडायचं आहे.

बबलू गेडाम यांचं कार्य पाहून लोकांमध्येही एक सकारात्मक संदेश गेला आहे. अनेकांनी त्यांच्या कार्याला हातभार लावण्यास सुरुवात केली आहे. आज त्यांच्या नावे स्वच्छता दूत हा सन्मान दिला जावा, अशी मागणी स्थानिक पातळीवरून होत आहे. शासन-प्रशासनानेही त्यांच्या या कार्याची दखल घेणं गरजेचं आहे.गौरव शामकुळे म्हणतात, स्वार्थी जगात निस्वार्थ सेवा करणारा मित्र मिळणं हीच खूप मोठी गोष्ट आहे. बबलू हा अशाच सेवाभावी वृत्तीचा माणूस आहे. त्याचं काम आमच्यासाठीही प्रेरणादायी आहे.

परिसराच्या स्वच्छतेसाठी एक झाडू आणि एक संकल्प पुरेसा असतो. बबलू गेडाम यांनी हे आपल्या कृतीतून सिद्ध केलं आहे. समाजाला आज अशाच कार्यकर्त्यांची, अशा कृतिशील नागरिकांची नितांत गरज आहे.

विवेकानंद महाविद्यालयाचे बारावीच्या परीक्षेत सुयश



भद्रावती । प्रतिनिधी

नुकत्याच लागलेल्या बारावीच्या निकालात स्थानिक कनिष्ठ विवेकानंद महाविद्यालयाचा निकाल लागला असून उत्कृष्ट निकाल लागला आहे. विवेकानंद कॉलेजच्या कनिष्ठ महाविद्यालयाचा निकाल पुढीलप्रमाणे लागला आहे. कला शाखेचा निकाल ५८.३३ निकाल लागला असून या शाखेत नयन राजीव धोटे, तनुश्री मनोहर मानकर, दीक्षा जगन्नाथ वानखेडे यांनी सुयश कमविले आहे. विज्ञान शाखेचा निकाल ९५.९१ टक्के लागला असून या शाखेत क्षितिज दिलीप राम, गौरव राजकुमार मत्ते, उज्वला नत्थू बोधाणे यांनी सुयश कमविले आहे. मेकॅनिकल टेक्नॉलॉजी या विषयात संघर्ष हरीश लांडगे, वैभव विकास आत्राम, साहिल रवींद्र कुटेमाटे यांच्यासह बँकिंगमध्ये आदित्य विकास खोब्रागडे, सानिया फिरोज शेख, निखिल संजय चव्हाण यांनी सुयश कमविले आहे. विवेकानंद ज्ञानपीठ वरोरा चे अध्यक्ष पुरुषोत्तम स्वान, सचिव अमन टेमुर्डे यांच्यासह संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्य यांच्या मार्गदर्शनात महाविद्यालयातील प्राचार्य, कनिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक तथा शिक्षकेतर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.

तो आला... आणि एका रात्रीत शेतकरी उध्वस्त झाला!

गारपीट, वादळ आणि पावसाने साक्री तालुक्यात शेतीचं कंबरडंच मोडलं

धुळे । उमाकांत अहिरराव

गेल्या तीन दिवसांपासून अवकाळी पाऊस आणि गारपिटीने साक्री तालुक्यात हाहाकार माजवला आहे. एकाच रात्रीत आलेल्या वादळी पावसाने शेतकऱ्यांचं पूर्ण आयुष्य उद्ध्वस्त केलं कांद्याचे ढिगारे भिजले, कैऱ्यांची गळ, डाळिंबाची फळं आणि जनावरांचा चारा वाहून गेला.

शुक्रवारी सकाळपासूनच ढगाळ वातावरण होते. हळूहळू काळसर ढग जमू लागले आणि दुपारनंतर आकाश फाटल्यासारखा मुसळधार पाऊस, वादळी वारे आणि गारांचा जोर सुरू झाला. या अनपेक्षित हल्ल्यामुळे शेतकरी आणि शेतमजुरांची चांगलीच धावपळ उडाली.



खुल्या शेतात सुकवण्यासाठी ठेवलेला कांदा पूर्णतः भिजला, काही ठिकाणी मका जमिनीतच कुजण्याच्या मार्गावर आहे. फळबागांना जबरदस्त फटका बसला असून कैऱ्यांची मोठ्या प्रमाणावर गळ झाली. डाळिंब पिकावरही परिणाम झाला आहे.याशिवाय, जनावरांसाठी मशीनने तयार केलेला कटलेला चारा देखील पावसात भिजल्याने निरुपयोगी ठरला. मजुरांची टंचाई असल्याने काही भागांतील कांदा अजूनही शेतातच असून, आता त्याचेही नुकसान अटळ दिसते.

एका रात्रीत सर्व काही संपल्याची भावना शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत आहे.अशा संकटाच्या काळात सरकारकडून तातडीच्या मदतीची शेतकऱ्यांना अपेक्षा आहे.हवे असल्यास मी हाच मजकूर सोशल मीडियावर पोस्ट करता येईल अशा स्वरूपात किंवा सादर करण्यासाठी निवेदनाच्या रूपातही तयार करू शकतो. करायचं का?

शहर पाण्याविना कोरडं आणि विरोधक श्रेयाविना अस्वस्थ!



वरोरा शहरात भीषण जलसंकट निर्माण झालं आहे. नळाला पाणी नाही, टाक्या कोरड्या आहेत आणि नागरिक दिवसेंदिवस हवालदिल होत चालले आहेत. अशा वेळी गांधी सागर तलावाच्या खोलीकरणाचे काम म्हणजे शहरासाठी एक दिलासा ठरणारी शक्यता होती. विशेष म्हणजे या कामाची दिशा खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या पुढाकारामुळे निश्चित झाली होती. मात्र, काम सुरू होण्याच्या क्षणीच विरोधकांचा हस्तक्षेप झाला आणि साऱ्या घडामोडींना राजकीय वळण मिळालं.

खासदार धानोरकर यांनी नुकत्याच झालेल्या प्रशासन बैठकीत गांधी सागर खोलीकरणाचा विषय मांडत जलसाठ्याच्या वृद्धीसाठी हे काम तातडीने सुरू करण्याचे निर्देश दिले. हे काम थेट पाणीपुरवठ्यासाठी नव्हते, हे त्यांनी स्पष्ट केलं होतं. मात्र, खोलीकरणामुळे भूगर्भातील पाण्याचा स्तर वाढेल आणि शहराच्या विहिरी, बोअरवेल्स यांना फायदा होईल हे एक वैज्ञानिकदृष्ट्या सिद्ध झालेले सत्य आहे.

तथापि, या उपक्रमाला विरोधकांचा आडवा हात बसला. सोशल मीडियावरून उघड झालेल्या माहितीप्रमाणे, जिल्हाधिकारी आणि पालकमंत्र्यांना संपर्क करून हे काम थांबवण्यात आले. कारण एकच श्रेय कुणाच्या नावावर जावं? शहराच्या तहानलेल्या नागरिकांपेक्षा 'क्रेडिट' मिळण्याचा हव्यास मोठा ठरला. आणि हे चित्र लोकशाहीसाठी क्लेशदायक आहे.तसं पाहिलं तर, मागील वर्षी या तलावाच्या खोलीकरणाच्या नावाखाली झालेल्या भ्रष्टाचाराच्या आरोपांची पार्श्वभूमीही लक्षात घ्यावी लागेल. नगरपरिषदेच्या खर्चावर खोलीकरण केल्याचं दाखवून माती थेट लेआऊटमध्ये टाकण्यात आली. डिझेलचा खर्च सरकारी आणि माती गेली बिल्डरांच्या घशात अशी चर्चा शहरात आणि सोशल मीडियावर अजूनही सुरू आहे. त्यामुळे, या वर्षीही काहीतरी 'गोंधळ' होणार की काय, अशी संशयाची पाल सर्वसामान्यांच्या मनात उगम पावते.

याच संदर्भात, शासनाने सखोल चौकशी करावी आणि कोणताही प्रकल्प पारदर्शक आणि लोकहितकारी आहे याची खात्री करावी हीच नागरिकांची अपेक्षा आहे. मात्र, या साऱ्या प्रक्रिया सुरू असतानाच, विरोधकांनी राजकीय कुरघोडीसाठी काम थांबवण्याचा पवित्रा घेणं हे वरोऱ्याच्या पाण्याइतकंच गंभीर आहे.

विरोधकांचं काम प्रश्न उपस्थित करणं हे नक्कीच लोकशाहीचं अविभाज्य अंग आहे. पण प्रश्न उपस्थित करताना लोकहिताचे काम थांबवणे, केवळ आपली छाया पडत नाही म्हणून उभं राहिलेलं काम मोडीत काढणे हे दुर्दैव आहे. त्याहून वाईट म्हणजे, काम सुरू व्हायच्या आधीच त्यात अडथळा निर्माण करणं, हे त्या पक्षांची अस्वस्थता दाखवतं जी जनतेच्या हक्कापेक्षा स्वतःच्या राजकीय अस्तित्वाच्या झगड्याला अधिक महत्त्व देत आहे.

खासदार प्रतिभा धानोरकर यांचा यामध्ये हेतू स्वच्छ वाटतो. त्यांनी प्रशासनासोबत चर्चा करून, पारदर्शकतेचा आग्रह धरत काम सुरू करण्याची तयारी दाखवली. या प्रश्नावरून होणारा राजकीय आरोप-प्रत्यारोप थांबवण्यासाठी त्यांनी खुलं वक्तव्य दिलं. लोकांच्या प्रश्नांवर काम करण्याची ही जिद्द स्वागतार्ह आहे. आज वरोरा तहानलेलं आहे, आणि राजकीय वृत्ती मात्र श्रेयासाठी झगडत आहे. शहर कोरडं, पण मनं अधिक कोरडी झाली आहेत. अशा वेळी प्रशासनाने योग्य निर्णय घ्यावा, काम त्वरित पारदर्शकतेने सुरू करावं आणि विरोधकांनीही जनतेच्या हिताला प्राधान्य द्यावं हीच खरी काळाची गरज आहे.

–संपादक
आशिष मारोतराव घुमे

राष्ट्रीय लोक अदालतीमध्ये चंद्रपूर जिल्ह्यात ६२६ प्रकरणे यशस्वी निकाली



चंद्रपूर । प्रतिनिधी

राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, नवी दिल्ली व महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार आणि प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा समृद्धी भीष्म यांच्या मार्गदर्शनाखाली १० मे २०२५ रोजी चंद्रपूर जिल्हा न्यायालय व सर्व तालुक्यातील न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर लोक अदालतीमध्ये एकूण ८,४६६ प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे आणि ९,९८९ दाखलपूर्व प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी प्रलंबित न्यायालयीन प्रकरणांपैकी ४९५ प्रकरणे, तर दाखलपूर्व प्रकरणांपैकी १३१ प्रकरणे, असे एकूण ६२६ प्रकरणे यशस्वीपणे निकाली काढण्यात आली.

या अदालतीदरम्यान भूसंपादनाचे १ प्रकरण निकाली काढण्यात आले असून, त्यामध्ये ४ लाख ९५ हजार रुपये नुकसानभरपाई मंजूर करण्यात आली आहे. धनादेश (चेक) प्रकरणांपैकी ७३ प्रकरणे, तसेच कामगार व औद्योगिक न्यायालयातील एकूण २२ प्रकरणे देखील निकाली काढण्यात आली.या राष्ट्रीय लोक अदालतीचे आयोजन यशस्वी होण्यासाठी चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व न्यायाधीश, वकील, न्यायालयीन कर्मचारी व पोलीस कर्मचारी यांचे सहकार्य लाभले, अशी माहिती सुमित जोशी, सचिव, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, चंद्रपूर यांनी दिली आहे.

आ.किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून चंद्रपूरात होणार 'ग्लोबल पॅगोडा'च्या धर्तीवर विपश्यना केंद्राची उभारणी

मुंबई येथील जगप्रसिद्ध पॅगोडाची प्रतिकृती चंद्रपूरात उभारण्याचे प्रयत्न सुरू; मनपा अधिकाऱ्यांनी केली प्रत्यक्ष पाहणी

चंद्रपूर । प्रतिनिधी

चंद्रपूरमध्ये शांतता, साधना आणि मानसिक आरोग्यासाठी एक महत्त्वाचे केंद्र म्हणून विपश्यना केंद्र उभारण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून मुंबई येथील जगप्रसिद्ध ग्लोबल पॅगोडा च्या धर्तीवर चंद्रपूरात विपश्यना केंद्र उभारण्याचा निर्णय घेण्यात आला असून, त्यांच्या शिष्टमंडळाने चंद्रपूर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांसह ग्लोबल पॅगोडा ची प्रत्यक्ष पाहणी केली.

या शिष्टमंडळात महाथेरो डॉ. सुमनवन्नो, चंद्रपूर महानगरपालिकेचे शहर अभियंता रवींद्र हजारे, कनिष्ठ अभियंता नरेंद्र पवार, माजी नगरसेवक प्रदीप किरमे, श्याम हेडाऊ, धम्मभूमी महाविहाराचे उपाध्यक्ष राजेश थूल, कोषाध्यक्ष संतोष रामटेके आदींचा समावेश होता. यावेळी ग्लोबल पॅगोडा पॅलेसच्या जनसंपर्क अधिकारी शक्ती कपूर यांचे विशेष सहकार्य लाभले.या पाहणी दरम्यान वास्तुशिल्प, स्थानिक सुविधांचा वापर, साधकांसाठी आवश्यक रचना, पर्यावरणपूरक बांधणी आदी सर्व बाबींचा सखोल अभ्यास करण्यात आला. संबंधित तांत्रिक पथकाने संपूर्ण माहिती आणि व्हिडिओ चित्रीकरण गोळा करून त्याचे सादरीकरण आमदार किशोर जोरगेवार यांना केले.

या अभ्यास दौऱ्यानंतर आमदार जोरगेवार यांनी सांगितले, चंद्रपूरात पॅगोडाच्या धर्तीवर विपश्यना केंद्र उभारण्याच्या दिशेने लवकरच सकारात्मक पावले उचलली जातील. हे केंद्र केवळ ध्यानधारणा केंद्र न राहता, चंद्रपूरच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि पर्यटनदृष्ट्याही महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त करेल.विपश्यना साधना ही बौद्ध परंपरेतील शुद्ध अंतर्मुखी साधना असून, जगभरात लाखो लोक मानसिक शांती व स्थैर्यासाठी या मार्गाचा अवलंब करत आहेत. चंद्रपूरसारख्या ऐतिहासिक आणि निसर्गसंपन्न जिल्ह्यात हे केंद्र उभारल्यास ते विदर्भ व मध्य भारतासाठी एक प्रेरणास्थान ठरेल. या उपक्रमामुळे आध्यात्मिक पर्यटनालाही चालना मिळेल व नागरिकांच्या मानसिक आरोग्यवृद्धीसाठीही महत्त्वाची भूमिका बजावेल, असा विश्वास आमदार जोरगेवार यांनी व्यक्त केला.विधानसभा निवडणुकीदरम्यान शहरात भव्य विपश्यना केंद्र उभारण्याचा संकल्प आमदार जोरगेवार यांनी व्यक्त केला होता. आता त्यांनी त्या दिशेने प्रत्यक्षात कृती सुरू केली आहे. बाबूपेठ येथील धम्मभूमी महाविहाराच्या सात एकर जागेवर हे केंद्र उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी आराखडा, निधी उभारणी, शासनमान्यता प्रक्रिया आदींची कार्यवाही लवकरच सुरू होणार असून, या पहाणी दौऱ्यानंतर आमदार किशोर जोरगेवार यांनी मनपा अधिकाऱ्यांना परवानग्या व अन्य प्रक्रिया जलदगतीने पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत.



सेलू तालुक्यात बोगस कपाशी बियाण्यांचा काळाबाजार उघड टाकळी येथील एकास अटक, ५० लाखांचा मुद्देमाल जप्त

सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी

तालुक्यात बोगस कपाशी बियाण्यांच्या काळाबाजारावर मोठी कारवाई करत स्थानिक गुन्हे शाखा व कृषी विभागाच्या संयुक्त पथकाने वडगाव रोड, पराते लेआउट येथील एका गोदामावर शुक्रवारी रात्री १० वाजता छापा टाकला. या कारवाईत टाकळी (झडशी) येथील गोपाल सुरेश पारटकर (वय ३५) याला अटक करण्यात आली असून सुमारे ५० लाख ३ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

गोपाल पारटकर हा गुजरात राज्यातून प्रतिबंधित कपाशी बियाण्यांची खरेदी करून ती पराठे लेआउट येथील गोडाऊनमध्ये पॅकिंग करीत असल्याची गुप्त माहिती स्थानिक गुन्हे शाखेला मिळाली होती. पोलिसांनी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांसह छापा टाकला असता पारटकर हा कपाशीच्या बोगस बियाण्यांची पॅकेट कारमध्ये टाकताना रंगेहाथ आढळून आला.

तपासात निर्भय कॉटन, तिलक रिसर्च कॉटन सीड्स, आरसीएच ६५९, कबड्डी बीजीएस, पिंक कॉटन बिग बॉल इत्यादी कंपन्यांची भरलेली व रिकामी पॅकेट्स मोठ्या प्रमाणात आढळून आली. यासोबतच एक होंडा कार, पॅकिंग साहित्य व इतर साधनांसह मुद्देमाल जप्त करण्यात आला.तपासादरम्यान पारटकरने बियाणे गुजरातमधील जसूभाई पटेल यांच्याकडून खरेदी केल्याचे सांगितले. याप्रकरणी तालुका कृषी अधिकाऱ्यांच्या तक्रारीवरून सेलू पोलीस ठाण्यात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई पोलीस अधीक्षक अनुराग जैन, अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. सागर कवडे यांच्या मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक विनोद चौधरी, उपनिरीक्षक बालाजी लालपालवाले, राहुल इटेकर आणि कृषी अधिकारी संजय बमनोटे, सी. आर. माहुले आदींच्या संयुक्त पथकाने केली.



परिस्थितीवर मात करत प्रांजलने पूर्ण केले उच्चश्रेणी डॉक्टर होण्याचे स्वप्न

पुलगाव । प्रतिनिधी

सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थीही इतिहास घडवू शकतात, हे सिद्ध करणारे उदाहरण म्हणजे प्रांजल सांगोले. प्रतिकूल परिस्थितीतही स्वप्न पाहून त्यावर श्रद्धा ठेवून कष्ट करणारेच यश संपादन करतात. बालपणी पाहिलेले स्वप्न तरुणपणी साकार करणाऱ्या प्रांजलने जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या जोरावर वैद्यकीय क्षेत्रातील सर्वोच्च पदवी प्राप्त केली आहे.

पुलगाव येथील मध्यमवर्गीय कुटुंबातील मिलिंद सांगोले यांचा मुलगा प्रांजल सांगोले आज अनेकांसाठी प्रेरणास्थान ठरला आहे. अत्यंत प्रतिकूल आर्थिक परिस्थिती असतानाही त्याने वैद्यकीय क्षेत्रातील उच्चतम पदवी म्हणजेच एम.सी.एच. (चउक) मिळवून इतिहास घडविला.



प्रांजलने आपले दहावीपर्यंतचे शिक्षण सेंट जॉन हायस्कूल, पुलगाव येथे पूर्ण केले. त्यानंतर बारावीचे कोचिंग अकोला येथे घेतले. शिक्षणासाठी अकोल्यातील डॉ. चांडक यांनी त्याला आपल्या घरी ठेवले आणि वेळोवेळी आर्थिक व मानसिक आधार दिला. त्यानंतर प्रांजलने केईएम मेडिकल कॉलेज, मुंबई येथून एमबीबीएस, बी.जे. मेडिकल कॉलेज, अहमदाबाद येथून एम.एस. (सर्जरी) ही पदवी संपादन केली.पण एवढ्यावर न थांबता त्याने ख्रिश्चन मेडिकल कॉलेज, वेल्लोर (तामिळनाडू) येथून एम.सी.एच. ही विशेष पदवी प्राप्त केली. विशेषतः लिव्हर ट्रान्सप्लांटसाठी ही पदवी अत्यंत महत्त्वाची मानली जाते. अशा प्रकारे प्रांजलने वैद्यकीय क्षेत्रात आपला ठसा उमठवला.प्रांजल लहानपणापासूनच अभ्यासात अत्यंत हुशार होता. त्याचे वडील कृषी उत्पन्न बाजार समितीत चतुर्थ श्रेणी कर्मचारी म्हणून कार्यरत असून कुटुंबाची आर्थिक स्थिती अत्यंत हलाखीची होती. तरीही, प्रांजलने आपल्या परिस्थितीवर मात करत बालपणापासून बाळगलेले 'मोठा डॉक्टर' होण्याचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवले.प्रांजलच्या या यशामुळे त्याचे वडील मिलिंद सांगोले, आई शशी सांगोले आणि बहिण स्नेहा सांगोले अत्यंत आनंदित आहेत. त्याच्या यशाबद्दल राजेश शेंडे, सावरिया मारोठिया, बहादूर चौधरी, डॉ. मिलिंद ठोंबरे, अनिल तिवारी, प्रदीप तिवारी, अविनाश सांगोले, रवी केसरवानी, दीपक फुसाटे, संजय घागळे, प्रमोद राऊत, दिवाकर लोखडे, शैलेश टेभुर्णे, सचिन मेश्राम आणि इतर मित्रपरिवारानेही आनंद व्यक्त केला आहे.

चार सुवर्णपदक पटकावणाऱ्या साक्षी मुतेचे घवघवीत यश

वर्धा । संजीव वाघ

महात्मा गांधी आयुर्वेद महाविद्यालय तथा संशोधन केंद्र, सालोड येथे शिक्षण घेत असलेल्या बी.ए.एम.एस.च्या विद्यार्थिनी साक्षी कृष्णाजी मुते हिने आपल्या अभ्यासात सातत्यपूर्ण प्राविण्य राखून बी.ए.एम.एस.च्या चारही शैक्षणिक वर्षांत प्रथम क्रमांक पटकावला. विशेष म्हणजे तिने चार सुवर्णपदके मिळवून घवघवीत यश संपादन केले.

साक्षीच्या या उल्लेखनीय कामगिरीमुळे महाविद्यालयात आणि सालोड गावात आनंदाचे वातावरण आहे. तिच्या गौरवासाठी महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात दत्ताजी मेघे आणि डॉ. प्रीती अदानी तसेच सर्जन वाइस ॲडमिरल आरती सरीन (-VSM², VSM²) यांच्या हस्ते तिला चार सुवर्णपदक देऊन सन्मानित करण्यात आले.



महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. भरत राठी यांनी साक्षीच्या यशाबद्दल गौरवोद्गार काढताना सांगितले की, चारही वर्षांत प्रथम क्रमांक मिळवून सुवर्णपदक पटकावणे ही अत्यंत दुर्मीळ गोष्ट आहे. साक्षीने आपल्या अभ्यासू वृत्ती, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर हे यश मिळवले असून तिची ही असामान्य कामगिरी महाविद्यालयासाठी गौरवाची बाब आहे. ती इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्थान ठरेल.कार्यक्रमात आपले मनोगत व्यक्त करताना साक्षीने हे यश आपल्या आई-वडील, शिक्षक, मार्गदर्शक आणि मित्र परिवाराला समर्पित केले. तिने सांगितले की, पुढे आयुर्वेदाच्या माध्यमातून देशाची आणि समाजाची सेवा करायची आहे.साक्षी ही प्रतिष्ठित कृष्णाजी मुते व माजी पंचायत समिती सदस्य सविता मोठे यांची कन्या असून ती बालपणापासूनच अभ्यासू आणि शांत स्वभावाची आहे. तिच्या या यशामुळे आयुर्वेद, आरोग्यसेवा आणि संशोधन क्षेत्रात तिला अनेक संधी उपलब्ध होणार आहेत.या विशेष यशाबद्दल सालोड गाव, महाविद्यालय तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून साक्षीचे अभिनंदन होत असून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव केला जात आहे.

शिवानी सुस्कार यांच्यावर अत्याचार प्रकरणी नोंदविण्यात आली एफआयआर

आरोपी नितीन साळोखे उर्फ भाषा विरोधात गुन्हा दाखल

वर्धा । प्रतिनिधी

रामनगर पोलीस स्टेशन येथे नोंदविण्यात आलेल्या तक्रारीनुसार नितीन साळोखे उर्फ भाषा याच्यावर शिवानी सुस्कार यांनी गंभीर आरोप करत एफआयआर दाखल केली आहे. ही घटना जानेवारी २०२५ ते मे २०२५ दरम्यान घडल्याची नोंद आहे. आरोपीने विविध पद्धतीने मानसिक, सामाजिक व शारीरिक शोषण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

एफआयआर क्रमांक ०३२४ नुसार, भारतीय दंड संहिता कलम ३२९(४), १२६(२), २९६, १२०इ, आणि ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीडितेने आपल्या निवेदनात नमूद केले आहे की आरोपीने तिला विविध भावनिक आणि सामाजिक दबावाखाली ठेवले व तिचा शारीरिक फायदा घेण्याचा प्रयत्न केला.तक्रारदार शिवानी सुस्कार यांनी दिलेल्या प्रेस नोटमध्ये त्या म्हणतात की, त्रुतियपंथीय समाजाचे व्यावसायिक शोषण, अपमान व शारीरिक छळ ही गंभीर बाब असून, या घटनेने त्यांच्यावरील अविश्वास अधिक वाढवला आहे. 'बाईकी बहीण' म्हणवून, भावनिक नात्याचा गैरवापर करणे हे अत्यंत खेदजनक आहे.शिवानी यांनी आपली एफआयआर व प्रेस नोट जनतेसमोर आणत आरोपीविरोधात कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. या प्रकरणी अधिक तपास सुरू असून, संबंधित पोलीस ठाण्यातून तपास अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत.

मध्यरात्री पावशिने हल्ला; झाडगाव येथील युवक गंभीर जखमी, आरोपी फरार

झाडगाव (गो.) । प्रतिनिधी

झाडगाव येथील भूषण संजय शाहीर या युवकावर अज्ञात व्यक्तीने मध्यरात्री पावशिने वार करून गंभीर जखमी केल्याची धक्कादायक घटना घडली. ही घटना झाडगाव परिसरात शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली असून हल्लेखोर आरोपी घटनास्थळावरून फरार झाला आहे.

प्राप्त माहितीनुसार, भूषण शाहीर हे रात्री आपल्या राहत्या घरी असताना अज्ञात व्यक्तीने त्यांच्यावर पावशिने हल्ला चढवला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने सेवाग्राम रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू करून नागपूर ला पाठविण्यात आले.हल्ल्यानंतर आरोपीने घटनास्थळावरून पलायन केले असून, त्याचा शोध घेण्यासाठी सावंगी पोलीसांनी तपास सुरू केला



आहे. घटनेमागील कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही, मात्र हा पूर्ववैमनस्यातून झालेला हल्ला असल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे.सावंगी पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.

नामदार गोपाळकृष्ण गोखले यांची जयंती; महानगर पालिकेच्या वतीने साजरी



मुंबई । प्रतिनिधी

नामदार गोपाळकृष्ण गोखले यांच्या जयंतीनिमित्त, चर्चगेट जवळील, वीर नरिमन मार्गावरील नामदार गोपाळकृष्ण गोखले यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाच्या वतीने उप आयुक्त (सार्वजनिक आरोग्य) श्री. शरद उघडे यांनी आज (दिनांक ०९ मे २०२५) पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले. 'ए' विभागाचे सहायक आयुक्त श्री. जयदीप मोरे आणि महानगरपालिका उप सचिव श्रीमती नेहा पराडकर यावेळी उपस्थित होते.

अंधश्रद्धेच्या विळख्यात महिला होरपळली; कापूर जाळून गंभीर जखमी, सेलू पोलिसात गुन्हा दाखल

सिंदी (रेल्वे) । प्रतिनिधी

अंधश्रद्धेच्या नावाखाली टाकळी (झडशी) येथे एका ४६ वर्षीय महिलेला जबरदस्तीने हातावर कापूर जाळल्याची संतापजनक घटना घडली. या प्रकारात महिला गंभीर जखमी झाली असून, तिच्यावर सेवाग्राम रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी पुजारी भैयाजी बांडबैले यांच्या विरोधात ८ मे रोजी सेलू पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सविता मनोज पवार, रा. बाभूळगाव, असे जखमी महिलेचे नाव असून त्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी रोजंदारीवर काम करतात. त्या १५ एप्रिल रोजी झडशी टाकळी येथे पूजा स्वयंपाकासाठी गेल्या होत्या. यावेळी त्यांना भोवळ आल्याने त्या बेशुद्ध झाल्या. त्याच वेळी मंदिरातील पुजारी बांडबैले यांनी त्यांच्या उजव्या हाताच्या तळहातावर 'बजरंग' नावाच्या मोठ्या कापूराचा तुकडा ठेवून तो पेटवला, असा आरोप आहे. यामुळे सविता पवार यांच्या हाताला गंभीर इजा झाली.प्राथमिक उपचारांनंतर त्यांना सेवाग्राम रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी या प्रकरणाची माहिती पोलिसांना दिली. तपासात हा प्रकार अंधश्रद्धेच्या अधीन होऊन करण्यात आल्याचे निष्पन्न झाले. यानंतर ८ मे रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. मात्र, अद्याप आरोपीस अटक झालेली नाही. जखमी महिलेने व तिच्या मुलाने पोलीस अधीक्षक वर्धा यांची भेट घेऊन तोंडी तक्रार दिली. त्यानंतर महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार यांचीही त्यांनी भेट घेतली. सुरकार यांनी पीडित महिलेशी संवाद साधून त्यांचे समुपदेशन केले व मानसोपचारतज्ज्ञांमार्फत उपचार घेण्याचा सल्ला दिला.दरम्यान, इंज्युरी रिपोर्ट पोलिसांना उशिरा मिळाल्यामुळे कारवाईस विलंब झाला, अशी माहिती मिळाली आहे. पुजारी वयस्क असल्याने आणि कायदेशीर प्रक्रियेत अडथळे असल्याने येत्या सोमवारी अटकेची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

मॉक ड्रिल : युद्धजन्य परिस्थितीत कसं वागावं, बदलापुरात दाखवण्यात आलं प्रात्यक्षिक!

मॉक ड्रिलमध्ये काय घडलं?

सायरन वाजवून नागरिकांना सतर्क केलं गेल
नागरिकांना सुरक्षित स्थळी – बंकर किंवा सेफ हाऊस – नेण्याचा सराव
रस्त्यांवर बंदोबस्त, पोलिसांसोबत आर्मी जवानांची उपस्थिती
नागरिकांनी घाबरून न जाता दिलेल्या सूचनांचे पालन केले
दहशतवाद्यांना आता सडेतोड उत्तर देण्याची वेळ आली आहे.
बदलापूरकरांसह संपूर्ण देश केंद्र सरकार आणि जवानांच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे.



मॉक ड्रिल म्हणजे काय?

शत्रुहल्ल्याच्या किंवा आपत्तीच्या प्रसंगी नागरिकांनी घ्यावयाची काळजी आणि प्रशासनाने करावयाच्या कृतींचे सराव प्रात्यक्षिक म्हणजेच मॉक ड्रिल होय.

बदलापूर । प्रतिनिधी

जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारत-पाकिस्तानमध्ये तणाव वाढला आहे. संभाव्य युद्धाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने ७ मे रोजी देशभरात मॉक ड्रिल घेण्याचे आदेश दिले.त्याअंतर्गत बदलापूर (पूर्व) येथील श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगणावर युद्धजन्य परिस्थिती उद्भवल्यास नागरिकांनी कशी काळजी घ्यावी, याचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. या वेळी जिल्हाधिकारी, नागरी संरक्षण दल, पोलिस, होमगार्ड, सिव्हिल डिफेन्स आणि आपत्कालीन सेवा उपस्थित होत्या.

प्रवर्धन प्रमुख किसान प्रशिक्षण कार्यक्रम उत्साहात संपन्न

'पुष्कल' कपाशी वाणाचे लोकार्पण; शेतकऱ्यांमध्ये उत्साह

वैजापूर । अर्जुन शिंदे

दि. १० मे २०२५ (शनिवार) रोजी प्रवर्धन प्रमुख किसान प्रशिक्षण कार्यक्रम वैजापूर येथील मातोश्री हॉटेलमध्ये उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात श्रीरामचंद्र यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण व पूजन करून करण्यात आली.या वेळी कंपनीचे आरएसएम राहुल निकम यांनी शेतकऱ्यांना एक्स, रेवंथ, सौभाग्य, सायरस आणि पुष्कल या कपाशीच्या वाणांची सविस्तर माहिती दिली. हे सर्व वाण कमी कालावधीत उत्पादनास येणारे असून मध्यम व भारी जमिनीत चांगले उत्पादन देतात, तसेच यांना पाण्याची सहनशक्ती अधिक आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात प्रवर्धन कंपनीच्या 'पुष्कल' या नवीन कपाशी वाणाचे औपचारिक लोकार्पण करण्यात आले. यावेळी कंपनीचे टीएसएम राकेश निकम यांनी शेतकऱ्यांना रासायनिक खतांचा वापर कमी करून सेंद्रिय खत, शेणखत, गांडूळखत यांचा वापर वाढवण्याचे आवाहन केले. जमिनीत सेंद्रिय कर्ब वाढवणे ही काळाची गरज असून, कमी कालावधीत उत्पन्न देणारे वाण निवडून शेतीत प्रगती साधता येऊ शकते,असे त्यांनी सांगितले.कार्यक्रमाचे नियोजन कंपनीचे एमडी राहुल म्हस्के यांनी केले होते. पंचक्रोशीतील विविध गावांमधील निवडक प्रगतशील शेतकरी कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित होते. रेवंथ, सौभाग्य आणि पुष्कल या वाणांना शेतकऱ्यांनी भरभरून प्रतिसाद दिला.कार्यक्रमाची सांगता चविष्ट भोजनाने झाली.



दैनिक
सह्याद्रीचा राखणदार

खरीप हंगामात शेतक-यांसाठी सूक्ष्म नियोजन करा-पालकमंत्री डॉ.उईके

चंद्रपूर । प्रतिनिधी



खरीप हंगाम हा शेतकऱ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा असतो. या हंगामावरच शेतकऱ्यांच्या कुटुंबाचा वर्षभर उदरनिर्वाह होतो. त्यामुळे जिल्ह्यात खते, बियाणे यांची मुबलक उपलब्धता ठेवून शेतकऱ्यांसाठी अतिशय सूक्ष्म नियोजन करावे, अशा सूचना राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी केल्या.नियोजन सभागृह येथे कृषी विभागाच्या वतीने आयोजित खरीप हंगामपूर्व आढावा बैठकीत ते बोलत होते. यावेळी आमदार सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, कीर्तीकुमार भांगडिया, करण देवतळे, देवराव भोंगळे, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंग, अतिरिक्त पोलिस अधीक्षक रीना जनबंधू, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार, आत्माचे संचालक अरुण कुसळकर आदी उपस्थित होते.

खतेलिंकिंग संदर्भात जिल्ह्यात अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, असे सांगून पालकमंत्री डॉ. उईके म्हणाले, लिंकिंग संदर्भात लवकरच आढावा बैठक घेण्यात येईल. हा विषय राज्यस्तरीय खरीप हंगामपूर्व बैठकीत सुद्धा मांडण्यात येईल. शेतकऱ्यांना बँकांनी त्वरित पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, शेतकऱ्यांची अडवणूक करू नये. तसेच शेतकऱ्यांच्या योजनांचा निधी /अनुदान बँकांनी पीक कर्जात कापू नये. जिल्ह्यात चोर बीटीची वाहतूक, विक्री, साठवणूक होणार नाही, याची काळजी घ्यावी. त्यासाठी पथके तयार करून गस्त घालावी. गाव स्तरावरील कृषी यंत्रणेने प्रत्यक्ष गावात जाऊन शेतकऱ्यांना मार्गदर्शन करावे. जिल्ह्याच्या कृषी विषयक बाबींची माहिती राज्यस्तरीय बैठकीत मांडण्यात येईल, असेही डॉ. उईके यांनी सांगितले.

आमदार सुधीर मुनगंटीवार म्हणाले, चंद्रपूर हा धानाचा जिल्हा आहे. एक जिल्हा एक उत्पादन या अंतर्गत चंद्रपूरमध्ये ध्यान अधोरेखित झाले आहे. राज्य सरकारने धरणाचे उत्पादन तसेच अत्याधुनिक तंत्रज्ञानासाठी चंद्रपूर जिल्ह्याला दरवर्षी २० कोटी रुपये द्यावे. शेततळ्याचे अनुदान ७५ हजार रुपयावरून ९० हजार रुपये करावे. रोजगार हमी योजनेचे प्रलंबित ४५ कोटी रुपये ताबडतोब जिल्ह्याला मिळावे. तसेच शेतकऱ्यांना वीज कनेक्शन देण्याचे धोरण ठरवावे, अशी मागणी आमदार मुनगंटीवार यांनी केली. यावेळी इतरही आमदारांनी सूचना केल्या.

चंद्रपूर जिल्ह्यात एकूण ५ लक्ष ५२ हजार ७२९ हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आहे. यात सर्वसाधारण खरीप क्षेत्र ४ लक्ष ५८ हजार ७२९ तर सर्वसाधारण रब्बी क्षेत्र ८८,२४५ आहे. जिल्ह्यात भात, सोयाबीन, कापूस, तूर, ज्वारी ही महत्त्वाची पिके असून सन २०२५- २६ करिता एकूण ४ लक्ष ७५ हजार हेक्टरवर खरीप लागवडीचे नियोजन करण्यात आले आहे. खरीप हंगाम २०२५ साठी जिल्ह्यात ६४५८३ क्विंटल बियाणांची मागणी नोंदविण्यात आली आहे. तसेच खरीप हंगामाकरीता १ लक्ष ६७ हजार १७८ मेट्रीक टन रासायनिक खतांचे वावंटन प्राप्त झाले आहे. यावर्षी १२५० कोटी रुपये पीक कर्ज वाटपाचे नियोजन आहे, असे बैठकीत सांगण्यात आले.तत्पुर्वी मान्यवरांच्या हस्ते शेतीविषयक योजनांच्या पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. हरीतक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून कार्यक्रमाचे सुरूवात झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर तोटावार यांनी केले. बैठकीला कृषी विभागाचे अधिकारी, बँकेचे अधिकारी, कृषी केंद्र संचालक आदी उपस्थित होते.

परभणी मध्यवर्ती बँकेच्या गेटवर दररोजची गर्दी;ग्राहक त्रस्त,निराधार महिलांनाही अडचण

गंगाखेड । प्रतिनिधी



परभणी मध्यवर्ती बँकेमध्ये रोजच्या व्यवहारादरम्यान ग्राहकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. बँकेचे मुख्य गेट बंद ठेवून बाहेरूनच व्यवहार सुरू असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः निराधार महिलांना पैसे काढण्यासाठी मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत असून, त्यांना विड्रॉल स्लिपदेखील वेळेवर दिल्या जात नाहीत, अशी तक्रार समोर आली आहे.

सध्या उन्हाच्या तीव्रतेमध्ये ग्राहकांना गेटबाहेर उभे ठेवून व्यवहार पार पाडले जात असल्याचे चित्र दिसून येते. अनेकदा रोख रक्कम उपलब्ध नसल्याने नागरिकांना रिकाम्या हाताने परतावे लागते. दुसऱ्या दिवशीही पैसे मिळतीलच याची खात्री नसते, अशी माहिती काही स्थानिक ग्राहकांनी दिली.

यासंदर्भात प्रतिनिधींनी बँक मॅनेजरशी संपर्क साधला असता, गेट बंद का ठेवण्यात येतो, याबाबत किंवा विड्रॉल स्लिप महिला ग्राहकांना का मिळत नाही, यावर कोणतीही ठोस माहिती देण्यात आली नाही.बँकेच्या आवारात पिण्याच्या पाण्याचीही सोय नसल्यामुळे उन्हाळ्यात नागरिकांची विशेषतः महिलांची आणि ज्येष्ठ नागरिकांची गैरसोय होत आहे. यामुळे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी याकडे तात्काळ लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

आपत्कालीन संकटाच्या छायेत-सरकारचा संवेदनशील निर्णय उपाशीपोटी राहत असलेल्या लाखो गरीब कुटुंबांसाठी दिलासा

शिरूर । रमेश बनसोडे



संकटाची संभाव्यता ओळखून, गरिबांच्या पोटातील भूक समजून सरकारने तातडीने पावले उचलली आहेत. केंद्र सरकारने संभाव्य आपत्तीच्या पार्श्वभूमीवर सर्व राज्यांना सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत आणि त्यानुसार राज्य शासनाने गरजूंना वेळेत धान्य पुरवठा करण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

या निर्णयामुळे लाखो गरिबांच्या चेहऱ्यावर दिलासादायक श्वास उमठला आहे. उपाशीपोटी झोपणाऱ्या कुटुंबांना एक नवा आशेचा किरण दिसतो आहे.

पावसाळ्यात, विशेषतः जून, जुलै आणि ऑगस्ट महिन्यांमध्ये, देशातील कोट्यवधी गरीब नागरिकांना जेवणाची चिंता सतावत असते. या काळात अंत्योदय आणि प्राधान्य कुटुंब योजनेतील लाभार्थ्यांना तीन महिन्यांचे धान्य एकत्रित मिळणार आहे, ज्यात तांदूळ आणि गहू यांचा समावेश आहे. आणि हे सर्व मोफत दिले जाणार आहे.

ही योजना ८७ हजार अंत्योदय रेशनकार्डधारक आणि ६ लाखाहून अधिक प्राधान्य कुटुंब लाभार्थ्यांसाठी दिलासा देणारी ठरणार आहे. पुरवठा विभागने यासाठी व्यापक तयारी केली आहे. पावसाळ्यात येणारे पूर, वाहतूक अडचणी, गोदामांची कमतरता यांसारख्या अडचणींचा विचार करून धान्याची आगाऊ उचल केली जाणार आहे. या सर्व नियोजनाचे पूर्णत्व ३० मेपूर्वी होईल.

वाहतूक व्यवस्था, गोदाम जागा आणि रेशन दुकानदार यांच्याशी समन्वय साधून गरजूंना धान्य तातडीने पोहोचवले जाईल. रेशन दुकानदारांनी दररोज दुकान उघडण्याचे निर्देश मिळाले आहेत, जेणेकरून लाभार्थ्यांना ताटकळावे लागू नये.

ही योजना केवळ एक प्रशासकीय आदेश नाही, तर भुकेल्या लेकराच्या आईच्या डोळ्यांतून ओघळणारे अश्रू आहेत. सरकारने हा निर्णय वेळेत घेतला, नाहीतर या पावसाळ्यात अनेक कुटुंबांच्या चुली न पेटल्याची शोकांतिका घडली असती.

विद्यार्थ्यांसाठी 'गुरुजी' गावागावात पटसंख्या टिकवण्यासाठी शाळांची धडपड

रोहित कामडे । मूल



एकेकाळी शाळेत प्रवेश घेण्यासाठी विद्यार्थी आणि पालकांना प्रतीक्षा यादीची चिंता असायची. मात्र आजची परिस्थिती पूर्णपणे उलटली आहे. शैक्षणिक गुणवत्ता आणि विद्यार्थ्यांची पटसंख्या टिकवण्यासाठी आता शिक्षकांनाच गावोगाव भटकंती करावी लागत आहे. शाळांचे दरवाजे उघडे आहेत, पण त्या दरवाजातून पाऊल टाकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी शिक्षण संस्था हात जोडून विनवणी करत आहेत.

शिक्षकांच्या या प्रयत्नांना आता सुट्ट्यांचाही विसर पडला आहे. सुट्ट्यांमध्ये आराम न करता ते वर्गतुकडचा वाचवण्यासाठी गावोगाव विद्यार्थ्यांच्या मागे धावत आहेत. कोणत्या सुविधांची पूर्तता शाळेत होते, कोणते कोर्स उपलब्ध आहेत, याची महती सांगितली जात आहे. काही शिक्षक तर पालकांना वेगवेगळी आश्वासने देत प्रलोभनही दाखवत असल्याचे पाहायला मिळत आहे.

खासगी शाळांमध्ये शिक्षकांना विद्यार्थ्यांचे टार्गेट देण्यात येत असल्याने, त्यांनी पटसंख्या मिळवण्यासाठी धडपड सुरू केली आहे. संस्थाचालकांकडून किमान इतके प्रवेश मिळवाच असा दबाव येत असल्याचे शिक्षकांच्या चर्चेतून समोर येत आहे. विशेष म्हणजे काही शाळांमध्ये चौथीचा निकाल लागताच शिक्षक त्या भागातील शाळांमधून बाहेर उभे राहून पालकांची वाट पाहत आहेत, हे दृश्य विदारक आणि विचार करायला लावणारे आहे.कॉन्क्रेंट आणि खासगी शिक्षणसंस्थांच्या वाढत्या प्रभावामुळे जिल्हा परिषद शाळा मागे पडताना दिसत आहेत. पालक आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत घालण्याला प्राधान्य देतात. यामुळे जिल्हा परिषद शाळांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या दिवसेंदिवस घटत आहे. विशेष म्हणजे ही घरघर केवळ सरकारी नव्हे, तर काही जुन्या खासगी शाळांनाही जाणवू लागली आहे.शैक्षणिक गुणवत्ता ढासळलेल्या शाळांकडे विद्यार्थ्यांचा कल राहिलेला नाही. आणि जिथे गुणवत्ता आहे तिथेही टिकून राहण्यासाठी शिक्षकांना सशक्त प्रचार करावा लागत आहे. हे चित्र केवळ मूल शहरापुरते मर्यादित नसून, संपूर्ण जिल्ह्यातील ग्रामीण भागातही दिसून येत आहे. विद्यार्थ्यांमध्ये विश्वास निर्माण करण्यासाठी आणि शाळेचा स्तर उंचावण्यासाठी फक्त प्रचार पुरेसा ठरत नाही, तर त्यामागे ठोस गुणवत्ता असणे आवश्यक आहे. संस्थांनी आणि शिक्षकांनी केवळ पटसंख्या टिकवण्यापेक्षा, गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यावर भर दिल्यास पालकांचा नैसर्गिक कल त्या शाळांकडे वळेल.

महिला सुरक्षा व सक्षमीकरण शिबिरा साठी ८८ मुली यवतमाळला रवाना

बिटरगाव ठाणेदार कैलास भगत यांच्या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद



उमरखेड । प्रतिनिधी

बिटरगाव पोलिस स्टेशनचे ठाणेदार कैलास भगत यांनी महिलांच्या सुरक्षेसाठी व सक्षमीकरणासाठी यवतमाळ येथे आयोजित प्रशिक्षण शिबिरासाठी परिसरातील मुलींना सहभागी होण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून परिसरातील एकूण ८८ मुली हे प्रशिक्षण घेण्यासाठी रवाना झाल्या आहेत.

प्रशिक्षणाला जाण्यापूर्वी ठाणेदार भगत यांनी सर्व मुलींना मार्गदर्शन करताना सांगितले की, स्त्री ही समाजाच्या अर्ध्या भागाचे प्रतिनिधित्व करते. परंतु आजही अनेक प्रकारच्या सामाजिक, मानसिक आणि आर्थिक अडचणींमुळे ती मागे राहते. तिच्या जीवनशैलीत सुधारणा होण्यासाठी आणि तिच्या अधिकारांची जाणीव होण्यासाठी अशा प्रशिक्षण शिबिरांची गरज आहे.ते पुढे म्हणाले, आजही अनेकांना वाटते की महिलांनी फक्त चूल आणि मूल यावर लक्ष केंद्रीत करावे. मात्र, आता काळ बदलला आहे. महिलांनी देश आणि विदेशातही आपली ओळख निर्माण करावी. घटनेने त्यांना दिलेले अधिकार आणि संधी यांची माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचवणे, त्यांना आत्मनिर्भर बनवणे हे आपले कर्तव्य आहे.तेव्हा जमादार रवी गिते, रोशन सरनाईक, दत्ता कुसराम आणि निलेश भालेराव यांनी मुलींना यवतमाळकडे रवाना करण्यासाठी लागणारी सर्व तयारी केली. बसमधून प्रशिक्षण स्थळी पाठवताना मुलींच्या चेहऱ्यावर आत्मविश्वास आणि उत्साह स्पष्ट दिसून येत होता.

महामंडलेश्वर स्वामी परमानंद गिरीजी महाराज यांचा ६८वा अवतरण दिन उत्साहात साजरा

वैजापूर । अर्जुन शिंदे



राष्ट्रसंत जगद्गुरु जनार्धन स्वामी महाराज यांचे शिष्य तथा श्रीक्षेत्र भांगसी माता गडाचे परमपूज्य श्री श्री १००८ महामंडलेश्वर स्वामी परमानंद गिरीजी महाराज यांचा ६८ वा अवतरण दिन दिनांक १० मे रोजी भक्तिभावातम वातावरणात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या निमित्ताने वैजापूर तालुक्यातील श्रीक्षेत्र गोळवाडी येथे विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. उत्सवाच्या प्रसंगी गावातील भाविक भक्तांनी मोठ्या श्रद्धेने उपस्थित राहून महाराजांच्या चरणी आपली भक्ती अर्पण केली.कार्यक्रमावेळी प्रमुख उपस्थिती रामकिसन वाकचौरे, चंदू साळुंके (गवळीबाबा कृषी सेवा केंद्र) यांची होती. या दिवशी कीर्तन, नामस्मरण व महाराजांच्या सेवा-कार्याचा गौरव करणारे प्रवचनही पार पडले.कार्यक्रमाचे आयोजन स्थानिक भक्त मंडळ व ग्रामस्थांनी केले होते. अवतरण दिनाच्या निमित्ताने महाराजांच्या आशीर्वादासाठी भाविकांची मोठी गर्दी पाहायला मिळाली.

पिंपरी दुमालात विकासाची नवी पहाट २१ लाखांच्या कामांचा जल्लोषात शुभारंभ

सशक्त रस्ते, सशक्त गाव या संकल्पनेला दिली नवी दिशा

शिरूर । रमेश बनसोडे



पिंपरी दुमाल (ता. शिरूर) ग्रामविकासाच्या वाटचालीत एक नवा टप्पा गाठत आहे. एकूण २१ लाख रुपये खर्चाच्या विविध विकासकामांचे भूमिपूजन नुकतेच भव्य आणि उत्साही वातावरणात पार पडले. या कामांमुळे गावाचा चेहरामोहरा बदलणार असून, नव्या युगाच्या दिशेने गावाने ठोस पाऊल टाकले आहे.

ही विकासकामे ना. दिलीपराव वळसे पाटील (सहकार मंत्री) यांच्या मार्गदर्शनाखाली, तसेच आंबेगाव विधानसभा अध्यक्ष मानसिंग पाचुंदकर व पंचायत समितीचे सभापती विश्वास कोहकडे यांच्या शुभहस्ते सुरू झाली. गावात अमोळ डोळस ते नितीन शेलार मार्गासह काँक्रिटीकरण रस्त्यांची कामे लवकरच सुरू होणार असून, त्यासाठी लेखाशिर्ष ३०५४ अंतर्गत निधी मंजूर करण्यात आला आहे. या भव्य उद्घाटन सोहळ्याला शिरूर खरेदी-विक्री संघाचे संचालक लहू थोरात, दत्तात्रय कदम, सरपंच महेंद्र डोळस, उपसरपंच निकिता विजय खेडकर यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, सामाजिक कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. या विकासकामांमुळे गावात केवळ पायाभूत सुविधा नव्हे तर नागरिकांच्या जीवनशैलीतही सकारात्मक बदल घडणार आहे. ग्रामपंचायतीच्या पुढाकाराने आणि लोकप्रतिनिधींच्या सहकार्याने पिंपरी दुमालात विकासाचे नवे स्वप्न प्रत्यक्षात उतरू लागले आहे.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .